स्वातंत्र्य लढयामध्ये भाग घेतांना ज्यांना अपंगत्व आले किंवा जे गोळीबाराने जखमी झाले अशांना, व स्वातंत्र्य संग्रामामध्ये भाग घेतल्यामुळे ज्यांना फटक्यांची शिक्षा झाली होती त्यांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलती देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओएस-१२८५/[१]/स्वा. सै. कक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २२.१.१९८६.

शासन निर्णय :-

स्वातंत्र्य लढयामध्ये भाग घेतांना ज्यांना अपंगत्व आले किंवा जे गोळीबाराने जखमी झाले अशांना व स्वातंत्र्य संग्रामामध्ये भाग घेतल्यामुळे ज्यांना फटक्यांची शिक्षा झाली होती त्यांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलती देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, स्वातंत्र्य लढयामध्ये भाग घेतांना ज्यांना अपंगत्व आले किंवा जे गोळीबाराने जखमी झाले अशांना व स्वातंत्र्य संग्रामामध्ये भाग घेतल्यामुळे ज्यांना फटक्यांची शिक्षा झाली होती त्यांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलती दिनांक १ मे, १९८५ पासून देण्यात याव्यात. सदरहू पेन्शनसाठी अर्ज अर्जदारांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्जाच्या ठराविक नमुन्यात करावयाचा आहे. अर्जाचे विहित नमुने जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयामध्ये मिळतील.

२. सदर बाबीवर होणारा खर्च लेखाशीर्ष "२८८- सामाजिक सुरक्षा व कल्याण [इ] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, [सी], स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना निवृत्तीवेतन [मागणी क्रमांक १३]". या शीर्षाखाली केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनुमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०३४/व्यय-४, दिनांक ३-१२-१९८५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ बा. क. चौगुले ]
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

..... २/-

प्रति,

१] राज्यपाल यांचे सचिव,

२] मुख्यमंत्री यांचे सचिव,

३] सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

४] अध्यक्ष व इतर सदस्य, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
मंत्रालय, मुंबई,

५] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,

६] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,

७] सर्व विभागीय आयुक्त,

८] सर्व जिल्हाधिकारी, [अर्जाच्या विहित नमून्यासह],

९] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१०] सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

११] निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,

१२] वित्त विभाग, ईरक्सपी-४, वित्त विभाग-जीईएन-५[ ५प्रतींसह]

१३] सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक २५,

१४] माहिती व जनसंपर्क संचालनालय [प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी]

१५] निवड फाईल.